# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता.जि.ठाणे**

**फोन नं. ०२२-२९४५१००१**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट २२२-२२** **दिनांक २५/०७/२०२२**

## दुचाकी वाहनावरुन येवुन जबरीने मोबाईल चोरी करणाऱ्या आरोपीतांना गजाआड करण्यात पेल्हार पोलीस स्टेशनच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाला यश.

पेल्हार पोलीस ठाणे हद्दीत बाईक वरुन येवुन पायी जाणारे इसमांचे मोबाईल जबरीने हिसकावून नेण्याबाबतच्या घटना घडत असल्याने वरिष्ठ पोलीस अधिकारी यांनी दिलेल्या सुचनांचे आधारे पेल्हार गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक माहितीच्या व गुप्त बातमीदार यांचेकडुन मिळालेल्या माहितीचे आधारावर संशईत नामे १) राजा यादव वय-१९ वर्षे, २) गणेश मोरे वय-२० वर्षे, दोन्ही रा. सातीवली, वसई पुर्व, ता. वसई, जि. पालघर हे चोरीचा मोबाईल विक्रिकरता येणार असल्याची माहिती मिळाल्याने सदर ठिकाणी सापळा रचुन सदर आरोपीत यांना ताब्यात घेवुन त्यांचेकडे विचारपुस करता त्यांनी त्यांचे ताब्यात मिळुन आलेला मोबाईल हो मोटर सायकल वरुन येवून जबरीने चोरी केल्याची माहिती दिली. नमुद आरोपीत यांना पेल्हार पोलीस ठाणे कडील गुन्हा रजि.नं. ६०४/२०२२ भां.द.वि.सं.कलम ३९२, ३४ या गुन्हयात दिनांक १६/०७/२०२२ रोजी अटक करण्यात आली होती. सदर आरोपीतांकडे पोलीस कोठडीदरम्यान अधिक कौशल्यपुर्वक विचारपुर्वक केली असता त्यांचेकडून पेल्हार पोलीस ठाणेकडील खालील ४ गुन्हयांची उकल करण्यात यश आले आहे.

१) पेल्हार पो.स्टे. गु.रजि.नं. I ६०४/२०२२, भा.दं.वि.सं. कलम- ३९२,३४ प्रमाणे, **(मुळ गुन्हा)**
२) पेल्हार पो.स्टे. गु.रजि.नं. I ६०६/२०२२, भा.दं.वि.सं. कलम- ३९२,३४ प्रमाणे,
३) पेल्हार पो.स्टे. गु.रजि.नं. I ६०८/२०२२, भा.दं.वि.सं. कलम-३९२,३४ प्रमाणे,
४) पेल्हार पो.स्टे. गु.रजि.नं. I ३०७/२०२२, भा.दं.वि.सं. कलम- ३८० प्रमाणे,

सदर आरोपीत यांचेकडून चोरी करण्याकरीता वापरलेल्या दोन पल्सर मोटर सायकल व ०६ मोबाईल फोन असा एकुण- १,७६,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी श्री. प्रशांत वाघुंडे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-३, श्री. रामचंद्र देशमुख, सहायक पोलीस आयुक्त, विरार विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री. विलास चौगुले, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पेल्हार पोलीस ठाणे, श्री. महेंद्र शेलार, पोलीस निरीक्षक (गुन्हे), गुन्हे प्रकटिकरण शाखेचे पोउपनि/सनिल पाटील, पोहवा/योगेश देशमुख, तुकाराम माने, तानाजी चव्हाण, पोना/प्रताप पाचुंदे, पोअं/संदिप शेळके, मोहसिन दिवाण, सचिन बळीद, रोशन पुरकर, बालाजी गायकवाड, किरण आव्हाड यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.